महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ २६ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २४१ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये


## संपादकीय

### 'ऑपरेशन मुस्कान'मुळे हरवलेली पावले पुन्हा घराकडे

राज्यात गेल्या वर्षभरात अल्पवयीन मुली व महिलांच्या बेपत्तेपणाची आकडेवारी धक्कादायक असली, तरी त्यामागे एक दिलासादायक बाजूही तितकीच महत्त्वाची आहे. तब्बल ४८ हजार २७८ महिला व अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याची माहिती राज्य सरकारने महाराष्ट्र विधानसभेत दिली असली, तरी यापैकी ३६ हजार ५८१ जणींचा शोध पोलिसांनी यशस्वीपणे लावला, ही बाब दुर्लक्षित करता येणार नाही. विशेषतः मुंबई, नवी मुंबई, रायगड, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या भागांमध्ये बेपत्ता होण्याचे प्रमाण अधिक असले, तरी पोलिस यंत्रणेने दाखवलेली तत्परता व सातत्यपूर्ण प्रयत्न समाजाला आश्वस्त करणारे आहेत. हरवलेल्या महिलांपैकी आणि अल्पवयीन मुलींपैकी मोठ्या संख्येने शोध लागणे, ही केवळ आकडेवारी नाही, तर अनेक कुटुंबांच्या आयुष्यात परतलेला दिलासा आहे. यात विशेष उल्लेख करावा लागेल तो महाराष्ट्र गृह विभागाच्या पुढाकाराने सुरू करण्यात आलेल्या 'ऑपरेशन मुस्कान'चा. २० जानेवारीपासून राबवण्यात आलेल्या या मोहिमेमुळे बेपत्ता व शोषित मुलांचा शोध घेऊन त्यांना पुन्हा पालकांच्या स्वाधीन करण्याची प्रक्रिया अधिक प्रभावी झाली आहे. मुंबईतून हरवलेल्या ४ हजार ५१५ अल्पवयीन मुले-मुलींपैकी ४ हजार ४५५ जणांचा शोध लागणे, हे या मोहिमेचे ठोस यश मानावे लागेल. नक्कीच, अजूनही १३ हजारांहून अधिक महिला व अल्पवयीन मुलींचा शोध लागलेला नाही, ही बाब चिंताजनक आहे. मात्र, याच वेळी शोध लागलेल्या हजारो मुली-महिलांची घरे पुन्हा उजळली आहेत, हेही तितकेच सत्य आहे. प्रशासन, पोलीस यंत्रणा, सामाजिक संस्था आणि नागरिक यांचा समन्वय अधिक बळकट झाला, तर ही आकडेवारी भविष्यात नक्कीच कमी होऊ शकते अल्पवयीन मुली व महिलांचे संरक्षण ही केवळ सरकारी जबाबदारी नसून सामाजिक जबाबदारीही आहे. सजग नागरिक, सतर्क यंत्रणा आणि संवेदनशील प्रशासन यांच्या एकत्रित प्रयत्नातूनच हरवलेली पावले पुन्हा सुरक्षित घराकडे वळू शकतात. 'ऑपरेशन मुस्कान'सारख्या उपक्रमांमुळे ही आशा अधिक दृढ झाली आहे.

एकूणच, बेपत्ता होणाऱ्या अल्पवयीन मुली व महिलांची वाढती संख्या समाजाच्या अंतःकरणाला हादरवणारी आहे. कायदे, मोहिमा आणि प्रशासनिक प्रयत्न आवश्यकच आहेत; मात्र त्याचबरोबर कुटुंब, शाळा, परिसर आणि समाज यांची सामूहिक जागरूकता तितकीच महत्त्वाची आहे. प्रत्येक हरवलेली मुलगी म्हणजे केवळ एक आकडा नाही, तर एका कुटुंबाचे उद्ध्वस्त झालेले स्वप्न आहे. त्यामुळे संरक्षण, प्रतिबंध आणि पुनर्वसन या तिन्ही पातळ्यांवर संवेदनशील आणि समन्वयित कृती झाली, तरच 'ऑपरेशन मुस्कान'सारख्या उपक्रमांना खऱ्या अर्थाने यश मिळेल आणि समाज अधिक सुरक्षित, जबाबदार व मानवी बनेल.

## भाजप महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस (कोकण विभाग) पदी

# आमदार ॲड. निरंजन डावखरे यांची नियुक्ती

### कोकण विभागाची जबाबदारी; संघटन बळकटीसाठी प्रभावी कामगिरीची दखल

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २५**

**ठाणे :** भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेशाच्या नव्या पदाधिकाऱ्यांच्या घोषणेत कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार ॲड. निरंजन डावखरे यांची भाजप महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस (कोकण विभाग) या महत्त्वपूर्ण पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे कोकण विभागातील भाजप संघटनेला नवे बळ मिळणार असल्याचे चित्र आहे. भाजप ठाणे शहर जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा निवडणूक प्रभारी तसेच रत्नागिरी जिल्हा परिषद, नगरपंचायत आणि ठाणे महानगरपालिका निवडणुकांमध्ये प्रभारी म्हणून जबाबदारी पार पाडताना आ.




डावखरे यांनी संघटनात्मक पातळीवर प्रभावी कामगिरी केली आहे. त्यांच्या कार्यतत्परतेची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी कोकण विभागाची महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली आहे.

**■ विश्वास सार्थ ठरवण्याचा निर्धार**

या नियुक्तीबाबत प्रतिक्रिया देताना आ. ॲड. निरंजन डावखरे म्हणाले की, भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, पक्षश्रेष्ठी तसेच महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्रदादा चव्हाण यांनी माझ्यावर विश्वास ठेवून कोकण विभागाच्या प्रदेश सरचिटणीसपदाची जबाबदारी दिली, याबद्दल मी मनःपूर्वक आभारी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली पक्षाने दिलेली जबाबदारी पूर्ण निष्ठेने पार पाडण्याचा माझा प्रयत्न राहील. कोकण विभागात संघटना अधिक मजबूत करणे, कार्यकर्त्यांशी सुसंवाद वाढवणे आणि जनतेचा विश्वास दृढ करणे, यासाठी मी कटिबद्ध आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**■ कोकणात पक्षविस्ताराला चालना**

आमदार ॲड. निरंजन डावखरे यांच्या नियुक्तीमुळे कोकण विभागात भाजपच्या संघटनात्मक कामाला गती मिळणार असून, आगामी काळात पक्षविस्तार व जनसंपर्क अधिक प्रभावीपणे राबवला जाईल, असा विश्वास पक्षाच्या वर्तुळातून व्यक्त केला जात आहे.

## शहापूर तालुक्यात कातकरी समाजाच्या मजुरीचे ६० लाखांहून अधिक रुपये थकीत

**आमदार राजेंद्र गावितांची विधानसभेत लक्षवेधी**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**■ प्रतिनिधी / दि. २५**

**ठाणे :** शहापूर तालुक्यात केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून विविध कल्याणकारी योजना राबविल्या जात असल्या तरी कातकरी समाजबांधवांच्या हक्काच्या मजुरीचा मोठा निधी अद्याप प्रलंबित असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. शहापूर तालुक्यातील कातकरी समाजातील नागरिकांना विविध योजनांतर्गत मिळणाऱ्या मजुरीपोटी तब्बल ६० लाख ५८ हजार २९६ रुपये थकीत असल्याची माहिती आमदार राजेंद्र गावित यांनी दिली आहे. ही बाब आमदार राजेंद्र गावित यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रश्न उपस्थित करत विधानसभेच्या निदर्शनास आणून दिली. त्यांनी सांगितले की, केवळ मजुरीच नव्हे तर २०१७-१८ पासून कातकरी समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या अनेक कल्याणकारी योजना आजही रखडलेल्या अवस्थेत आहेत.

**■ हक्काच्या मजुरीपासून वंचित**

कातकरी समाजातील नागरिकांकडून विविध शासकीय योजनांअंतर्गत कामे करून घेण्यात आली असून, त्याबदल्यात मिळणारी मजुरी अद्याप अदा करण्यात आलेली नाही. त्यामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या कातकरी समाजासमोर उपजीविकेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

## अंबरनाथ शेतकी सोसायटीच्या जागेवरील अतिक्रमणे हटविण्यास सुरुवात

### उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर 8 हेक्टर जागेवरील बेकायदेशीर बांधकामे जमीनदोस्त



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २५**

**अंबरनाथ : शासनाने दिलेल्या जागेचा नियमबाह्य पद्धतीने वापर केल्याचा ठपका ठेवत **मुंबई उच्च न्यायालय**ने अंबरनाथ येथील शेतकी सोसायटीची जमीन शासनजमा करण्याचे आदेश दिल्यानंतर प्रशासनाने प्रत्यक्ष कारवाईला सुरुवात केली आहे. ज्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी ही जागा आवश्यक आहे, त्या ८ हेक्टर क्षेत्रावरील बेकायदेशीर बांधकामे हटविण्याची मोहीम बुधवारी सुरू करण्यात आली.**

अंबरनाथ नगर परिषद आणि तहसिलदार यांच्या संयुक्त कारवाईत ६ बांधकामे, एक सुरक्षा भिंत तसेच एक बेकायदेशीर जीन्स धुलाई कारखाना जमीनदोस्त करण्यात आला. विशेष म्हणजे, या जागेवर जीन्स धुलाई कारखाना बिनदिक्कतपणे सुरू असून त्याचे सांडपाणी थेट वालधुनी नदीच्या उपनदीत सोडले जात असल्याचेही कारवाईदरम्यान उघड झाले.

**■ शेतीसाठी दिलेल्या जमिनीचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर**

अंबरनाथ सहकारी सामुदायिक शेतकी संस्थेला सन १९६३ मध्ये शेतीसाठी विनामूल्य दिलेली तब्बल २१० एकर सरकारी जमीन शासनजमा करण्याचा निर्णय उच्च न्यायालयाने जानेवारी महिन्याच्या अखेरीस दिला होता. न्यायालयाने शेतकी सोसायटीचे अपील फेटाळून लावत राज्य सरकारचा जमीन पुनर्ग्रहणाचा निर्णय पूर्णतः योग्य ठरवला. या जमिनीपैकी केवळ ७.६८ हेक्टर (सुमारे १९ एकर) क्षेत्रावर काही प्रमाणात झाडांची लागवड होती. उर्वरित जागेवर मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर घरे व चाळी, दुकाने, शेड, फार्महाऊस तसेच सुमारे ४०० ते ५०० अतिक्रमणे असल्याचे समोर आले असून शेती जवळजवळ पूर्णतः बंद असल्याचे स्पष्ट झाले.

## वाहतूक कोंडी फोडण्यासाठी कोपर उड्डाण पुलावर नवे नियोजन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २५**

**डोंबिवली :** डोंबिवली पश्चिमेतील कोपर उड्डाण पूल परिसरात पुलावर चढताना, उतरताना व वळण घेताना वाहने समोरासमोर येत असल्याने नियमित वाहतूक कोंडी होत होती. ही समस्या दूर करण्यासाठी डोंबिवली वाहतूक विभागाने सोमवारपासून पुढील ३० दिवस प्रायोगिक तत्त्वावर वाहतुकीत बदल लागू केला आहे. हा बदल यशस्वी ठरल्यास तो कायमस्वरूपी राबवण्याचा विचार असल्याचे विभागाकडून सांगण्यात आले. डोंबिवली पश्चिमेकडून पंडित दिन दयाळ रस्ता येथे जाताना, कोपर रस्ता भागातून पुलावर चढणारी वाहने तसेच डोंबिवली पूर्वेकडून पश्चिम दिशेने येऊन पंडित दिन दयाळ रस्ता व कोपर रस्ता भागात उतरणारी वाहने यामुळे नेहमीच समोरासमोर येऊन कोंडी होत होती.

**■ प्रस्तावाला उपायुक्तांची मंजुरी**

या कोंडीबाबत डोंबिवली वाहतूक विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीराम पाटील यांनी वाहतूक विभागाचे उपायुक्त पंकज शिरसाट यांच्याकडे कोपर उड्डाण पुलावरील वाहतूक बदलाचा प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावास उपायुक्तांनी मान्यता देत ३० दिवसांसाठी प्रायोगिक अंमलबजावणीस मंजुरी दिली आहे.

**■ हरकत असल्यास संपर्काचे आवाहन**

या बदलाबाबत नागरिकांना काही हरकत अथवा सूचना असल्यास त्यांनी तीन हात नाका येथील वाहतूक उपायुक्त कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन उपायुक्त वाहतूक कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.






## कामगारांच्या हक्कांसाठी भारतीय मजदूर संघाचे आंदोलन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** सर्व कामगारांना किमान वेतन लागू करावे, असंघटित क्षेत्रातील कामगारांना आरोग्य व पेन्शनसह सामाजिक सुरक्षेसाठी अर्थसंकल्पात ठोस तरतूद करावी, कंत्राटी कामगारांबाबत स्पष्ट धोरण जाहीर करावे तसेच घरेलू कामगार मंडळ पुनर्गठित करून बंद योजना पुन्हा सुरू कराव्यात, अशा विविध मागण्यांसाठी भारतीय मजदूर संघ, ठाणे जिल्हा यांच्या वतीने बुधवारी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालया समोर आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात शेकडो कामगार सहभागी झाले होते. भारत सरकारने २१ नोव्हेंबर २०२५ पासून नवीन कामगार कायदे लागू करण्याची घोषणा केली आहे. मात्र सन २०२६–२७ या आर्थिक वर्षासाठी सादर करण्यात आलेल्या ८० लाख कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पात नव्या कामगार कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी कोणतीही आर्थिक तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे सरकारकडून कामगारांकडे पूर्णतः दुर्लक्ष होत असल्याचा आरोप कामगार संघटनांकडून करण्यात येत आहे.

**■ देशव्यापी आंदोलनाची हाक**

संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगार, कंत्राटी कामगार, निवृत्त कर्मचारी, सुरक्षा रक्षक, स्कीम वर्कर्स, आशा, अंगणवाडी सेविका, घरेलू कामगार, बांधकाम मजूर, रिक्षा-टॅक्सी चालक, फेरीवाले, माथाडी आदी सर्व घटकांच्या मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी भारतीय मजदूर संघाने 'देशव्यापी सरकार जगावो' अशी हाक देत आंदोलन केले.

**■ निवेदन सादर**

यानुसार भारतीय मजदूर संघ ठाणे जिल्ह्याच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले. जिल्ह्यातील विविध कामगार संघटनांचे संघटित व असंघटित क्षेत्रातील कार्यकर्ते हातात झेंडे व फलक घेऊन मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान जिल्हा अध्यक्ष सचिन कदम आणि जिल्हा सचिव विलास आंबेकर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना कामगारांच्या मागण्यांचे निवेदन सादर केले.

## ठाण्यात स्विकृत नगरसेवक व समित्यांसाठी रस्सीखेच

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २५**

**ठाणे :** ठाणे महापालिकाची सर्वसाधारण सभा येत्या ५ मार्च रोजी आयोजित करण्यात आली असून या सभेत स्विकृत नगरसेवक, परिवहन समिती तसेच पाच विशेष समिती सदस्यांची निवड करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर इच्छुक नेत्यांमध्ये हालचालींना वेग आला असून, पक्ष नेत्यांकडे लॉबिंग सुरू झाल्याचे चित्र आहे. स्विकृत नगरसेवक पदासाठी निवडणुकीत पराभूत झालेले तसेच पक्ष नेतृत्वाच्या आदेशानंतर निवडणूक रिंगणातून माघार घेतलेले उमेदवार सक्रिय झाले आहेत. याशिवाय परिवहन समिती व पाच विशेष समित्यांमध्ये स्थान मिळावे, यासाठी अनेक इच्छुक वरिष्ठांच्या भेटीगाठी घेत आहेत.

**■ संख्याबळावरून समित्यांची गणिते**

ठाणे महापालिकेच्या निवडणुकीत शिवसेना (शिंदे गट) ७५, भाजप २८, राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार) १२, राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) ९, एमआयएम ५, शिवसेना (उबाठा) १ आणि अपक्ष १ असे एकूण १३१ नगरसेवक निवडून आले आहेत. यानंतर शिवसेना (शिंदे गट)च्या नगरसेविका शर्मिला पिंपळोलकर यांची महापौरपदी, तर भाजपचे नगरसेवक कृष्णा पाटील यांची उपमहापौरपदी निवड करण्यात आली होती.

**■ स्थायी समितीचा मुद्दा पुन्हा चर्चेत**

स्थायी समिती सदस्य निवडीचा विषय यापूर्वी पहिल्या सभेच्या पटलावर होता. मात्र तो अचानक मागे घेण्यात आला. आता येत्या सर्वसाधारण सभेच्या अजेंड्यावर हा विषय नसला तरी, शुद्धीपत्रक काढून स्थायी समिती सदस्य निवडीचा मुद्दा पटलावर आणण्याची तयारी प्रशासकीय पातळीवर सुरू असल्याची चर्चा आहे. आगामी सभेत कोणत्या पक्षाला आणि नेत्यांना समित्यांमध्ये किती प्रतिनिधित्व मिळते, याकडे ठाणेकरांचे लक्ष लागले आहे.

## अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर शासन सकारात्मक - मंत्री आदिती तटकरे

**अंगणवाडी सेविका-कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढण्याचे आश्वासन**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २५**

**मुंबई :** राज्यातील अंगणवाडी सेविका व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत शासन सकारात्मक भूमिका घेत असून अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे योगदान कौतुकास्पद असल्याचे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी स्पष्ट केले. मंत्रालयात आयोजित बैठकीत महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघ, महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी कृती समिती तसेच संयुक्त संघर्ष समितीच्या प्रतिनिधींशी संवाद साधताना त्या बोलत होत्या. बैठकीत सेविका-कर्मचाऱ्यांच्या मानधन, सेवा-सुरक्षा, कामकाजातील अडचणी तसेच कल्याणकारी उपाययोजनांबाबत



सविस्तर चर्चा झाली. अंगणवाडी व्यवस्थेच्या बळकटीसाठी कर्मचाऱ्यांची भूमिका महत्त्वाची असून त्यांच्या समस्या समजून घेऊन टप्प्याटप्प्याने निर्णय घेतले जातील, असे मंत्री तटकरे यांनी सांगितले. प्रतिनिधींनी मांडलेल्या मागण्यांचा सखोल आढावा घेऊन संबंधित विभागांशी समन्वय साधला जाईल. सकारात्मक चर्चेतून व्यवहार्य तोडगा काढण्याचा शासनाचा प्रयत्न राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.




# सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षण वर्गाची सांगता



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** संकल्प संस्था आयोजित सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षण वर्गाचा सांगता व प्रमाणपत्र वितरण सोहळा पंतवालावलकर स्कूल, नेहरू नगर येथे मोठ्या उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडला. सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले तसेच समाजकार्याची आवड असलेल्यांसाठी संकल्प संस्थेच्या वतीने १९ आठवड्यांचा सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग राबविण्यात आला होता.

या प्रशिक्षणामध्ये समाजकार्य म्हणजे काय, समाजकार्याचे महत्त्व, नेतृत्व गुण, संवाद कौशल्य, गटकार्य, प्रचार- प्रसिद्धी माध्यमे, समाजकार्यकर्त्यांची भूमिका तसेच विविध सामाजिक समस्या अशा एकूण ५२ विषयांवर ३५ तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून चार शनिवारी विविध सामाजिक संस्था, संघटना व शासकीय कार्यालयांमध्ये शैक्षणिक भेटी आयोजित करण्यात आल्या होत्या. यासोबतच दोन दिवसीय निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले त्यामध्ये व्यक्तिमत्त्व विकास, स्वयं- परिचय व गट उपक्रम यांवर मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या गायत्री सज्जन वरिष्ठ वैद्यकीय समाज विकास अधिकारी, के. जे. सोमय्या हॉस्पिटल उपस्थित होत्या. विशेष अतिथी म्हणून युगंधरा कोळी अभिनेत्री, मॉडेल व रील स्टार तसेच गौरी राव अखिल चित्रपट महामंडळ सदस्या आणि अभिनेत्री व शास्त्रीय कथ्थक नृत्यांगना तसेच सूरज भोईर अध्यक्ष मैत्री संस्था यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अविनाश पाटील व रेश्मा जगताप यांनी उत्कृष्ट प्रकारे केले.

# स्वातंत्र्यवीर सावरकर पुण्यतिथी



**(२८ मे १८८३ - २६ फेब्रुवारी १९६६)**

थोर देशभक्त, प्रखर हिंदु राष्ट्रवादाचा जनक, बुद्धीवादी नेता ,महान क्रांतिकारक, प्रतिभावंत कवी, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म 28 मे 1883रोजी नाशिक जिल्ह्यातील भगूर या गावी झाला. वासुदेव बळवंत फडके यांच्या आत्मयज्ञाच्या वातावरणामध्येच सावरकर यांचा जन्म झाला.

विनायक दहा वर्षाचा असताना त्यांच्या आई राधाबाई यांचे निधन झाले . विनायकाला गणेश(बाबाराव ) माई व नारायण अशी भावंडे होती. ते घरातील दुर्गा देवीची पूजा करीत असत. त्याचबरोबर रामायण, महाभारत, महाराणा प्रताप, शिवाजी महाराज यांच्या कथा ते वाचत. त्यांच्या बालमनावर अनेक चांगले संस्कार घरातील वातावरणात होत होते. लहानपणापासून त्यांना कविता करण्याचा छंद लागलेला होता. विनायकरावांचे प्राथमिक शिक्षण भगूरच्या शाळेत झाले. त्यांची स्मरणशक्ती फारच चांगली होती. त्यांना वाचनाची खूपच गोडी होती. ऐतिहासिक ,धार्मिक तत्त्वज्ञान या विषयावरची पुस्तके ते वाचित असत. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यावर पुढील शिक्षणासाठी त्यांच्या वडिलांनी त्यांना नाशिकला पाठवले .शिवाजी हायस्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला .त्यांचे मोठे बंधू बाबाराव सावरकर हेही तेथेच होते. त्यांनी 'अभिनव भारत' या नवीन संस्थेची स्थापना केली. एवढा व्याप करून देखील ते बी. ए .ची परीक्षा उत्तीर्ण झाले .आणि पुढे त्यांनी कायद्याचा अभ्यास सुरू केला. ते मुंबईला आले आणि पुढे ते युवकांचे नेते बनले. अधिक चांगले शिक्षण घेण्यासाठी ते इंग्लंडला गेले. क्रांतिकार्य करून सुद्धा ते बॅरिस्टरची परीक्षा पास झाले. पण त्यांना सनद देण्यास न्यायमंडळाने नकार दिला. देशप्रेमापुढे सावरकरांना बॅरिस्टरीच्या संधीचे महत्त्व अजिबात वाटत नव्हते. सावरकर लंडनमध्ये राहून क्रांतिकारकांना निरनिराळी मदत करीत होते .त्यामुळे भारतात क्रांतिकार्यास जोराने सुरुवात झाली होती. अनेक ठिकाणी बॉम्बस्फोट होत होते इंग्रज अधिकाऱ्यांवर हल्ले होत होते महाराष्ट्र आणि बंगाल या प्रांतात क्रांतिकारकांनी अनेक प्रकारे इंग्रज सरकारला आव्हान निर्माण केले होते त्यामुळे चिडून ब्रिटिश सरकारने अनेक क्रांतिकारकांना पकडून शिक्षा केल्या मदनलाल धिंग्रा हा सावरकरांचा तरुण अनुयायी होता. धिंगरा हे राष्ट्रीय वृत्तीचे होते सावरकरांनी त्यांना अभिनव भारताचे सभासद करून घेतले. धिगरांनी कर्झन वायलीवर गोळ्या झाडून त्याला ठार मारले . कर्झनला वाचविण्यासाठी धावून आलेला आणखी एक माणूसही ठार झाला होता. मदनलाल धिंग्रा यांना पकडण्यात आले. त्यांना फाशी देण्यात आले. सावरकरांनी 'डेली न्यूज'या वृत्तपत्रातून धिंग्रा या एक स्वातंत्र्यप्रेमी देशभक्ताविषयी जगजाहीर निवेदन दिले. त्यास स्वातंत्र्य प्रेमी हुतात्मा ठरविण्याचा सावरकरांचा हेतू त्यातून साध्य झाला. त्यामुळे सावरकरांच्या कुटुंबीयांचा भयंकर छळ सुरू झाला. बाबाराव सावरकरांना पकडून नेले त्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. त्यामुळे भारतीय लोक फार चिडले. इंग्रजी सत्तेविरुद्ध असंतोष माजला.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रेरणेतून चाफेकर बंधू, अनंत कान्हेरे, भगतसिंग, खुदीराम बोस ,प्रफुल्ल चाकी असे हजारो क्रांतिकारक घडले. मॅझिनीचे चरित्र, 1857 चे स्वातंत्र्य समर या पुस्तकांनी व स्वा. सावरकरांच्या लेखांनी आणि त्यांच्या भाषणामुळे युवा पिढी क्रांतिकार्याकडे खेचली गेली. देशाच्या विविध भागात पुस्तकांमध्ये रिव्हाल्व्हर पॅक करून त्याची पार्सलही पोहोचवली गेली .बॉम्बची कृती अनेक ठिकाणी पोहोचती करून बॉम्ब तयार केले गेले .आणि यासारख्या असंख्य क्रांतिकारी हालचाली मागे सावरकरांची प्रेरणा आणि सक्रिय सहभाग होता. त्यामुळे ब्रिटिश सरकार पार हादरून गेले होते. देशांमध्ये अराजकता पसरविणे, प्रक्षोभक वक्तव्य करणे, लोकांना चिथवणे, ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध बंड करणे या आरोपाखाली वीर सावरकरांना अटक होऊन त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला. त्यांना इंग्लंडहून सागर मार्गे मुंबई येथे नेताना एक जुलै 1910 रोजी त्याकाळी जगात गाजलेल्या सावरकरांच्या मार्सेलिस बंदरातील उडीने इंग्रज सरकार पार हादरून गेले होते. वीर सावरकरांना अंदमानच्या काळकोठडीत 50 वर्ष जन्म ठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली . सावरकरांना अंदमानमध्ये काळ्यापाण्याची शिक्षा भोगण्यासाठी पाठविले होते. अनेक हाल अपेष्टा त्यांना सहन कराव्या लागल्या. सावरकरांना जास्तीत जास्त त्रास देण्याचे कार्य तत्कालीनअंदमान कारागृहाचा अधिकारी बारी याला देण्यात आले होते. सावरकरांना 'डी' म्हणजे डेंजरस कैद्याचा दर्जा दिला होता . त्यांना तेलाच्या घाण्यावरून दहा दहा तास कोलू (घाणा) चालवावा लागत असे. अंदमान येथील सात क्रमांकाच्या चाळीतील वरच्या मजल्यावरील कोठडीत सावरकर बंदिस्त झाले होते. एकांतवासात सावरकरांचे मन काव्यरचने कडे वळले. अंदमानचे सावरकरांनी अनुष्टुप छंदाचा पुनरुद्धार केला .तुरुंगाच्या भिंती हे त्यांचे कागद बनले व घायपाताचा काटा ही त्यांची लेखणी झाली .भिंतीवर स्तंभ आखून लिहावयास त्यांनी सुरुवात केली. भीषण परिस्थितीत जन्मास आलेले सावरकरांचे 'कमला काव्य' म्हणजे मराठी भाषेचे एक दैदिप्यमान असे भूषण झाले कमला काव्याची निर्मिती होत असतानाच सावरकरांची बदली दुसऱ्या एका खोलीत झाली आणि मूळच्या खोलीत प्रयाग येथील स्वराज्य पत्राचे संपादक रामहरी यांचे वास्तव्य सुरू झाले. त्यांनी सावरकरांच्या मदतीने भाषेचा अभ्यास केलेला होता. या खोलीत येताच भिंतीवर लिहिलेले काव्य रामहरी यांनी पाठ करून टाकले. सुदैव असे की रामहरी यांची सुटका अंदमानातून लवकरच झाली. ते जेव्हा कलकत्त्यात आले तेव्हा बॅरिस्टर सावरकरांनी त्यांची भेट घेतली .या भेटीमध्ये रामहरींनी कमला काव्याच्या शेकडो ओळी पाठ म्हणून दाखविल्या. सावरकरांनी एक प्रत त्यावरून तयार केली. दरम्यानच्या काळात 1921 मध्ये सावरकर तुरुंगातून सुटून रत्नागिरी येथे स्थानबद्ध झाले.

वीर सावरकर यांनी संन्यस्त खड् .ग, उ:शाप,उत्तर क्रिया अशी तीन नाटके लिहिली 'माझी जन्मठेप' हे आत्मचरित्र लिहिले आणि 'काळे पाणी' ही कादंबरी लिहिली त्यांचे इतिहासाची सहा सोनेरी पाने 1857 चे स्वातंत्र्यसमोर हे ग्रंथ देखील प्रसिद्ध आहेत .पुढे ते हिंदू महासभेचे अध्यक्ष झाले 1938 च्या मुंबईच्या साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष झाले. 15 ऑगस्ट 1947 ला भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि तो दिवस सोन्याचा दिवस पाहण्याचे भाग्य सावरकरांना लाभले. आपणांस झालेले दुःख ते विसरून गेले सावरकरांच्या साऱ्या अपेक्षा पूर्ण झाल्या सर्व बांधवांबद्दल त्यांच्या मनात अपार श्रद्धा होती. अस्पृश्यता निवारण्यासाठी त्यांनी सहभोजन सुरू केले. भागोजी कीर यांच्याकडून पतित पावन मंदिर बांधून घेऊन ते अस्पृश्यांसाठी खुले केले . अपार कष्ट त्यांनी सोसले ते आजारी पडले. भारत मातेचा हा सुपुत्र दिनांक 26 फेब्रुवारी 1966 रोजी चिरनिद्रेत लीन झाला . अशाप्रकारे महान स्वातंत्र्यवीर मातृभूमीच्या कुशीत कायमचा विसावला .एक महाज्योत विझली. संपूर्ण देशावर शोक कळा पसरली ." माझ्या मृत्यूमुळे कुठलेही काम काज बंद ठेवू नका राष्ट्रीय उत्पादनात खंड पडू देऊ नका" असे त्यांनी आपल्या मृत्युपत्रात लिहून ठेवले होते . किती हे महान विचार! सावरकरांचे सर्व जीवनच प्रेरणा देणारे होते सावरकर म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीच्या यज्ञातील एक महान ज्वाला! त्यांचे देशप्रेम, त्याग ,बलिदान, सहनशक्ती आणि अफाट साहस हे गुण भविष्यात आपल्या देशातील प्रत्येक नागरिकाला सन्मार्ग दाखवतील. त्यांना मरणोतर 'भारतरत्न ' पुरस्कार प्रदान करण्यात यावा अशा या महान स्वातंत्र्य वीराला कोटी कोटी प्रणाम!



डॉ. आनंदराव सूर्यवंशी

# प्रभाग क्र. १९ मधील स्वच्छता मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे(25) :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून व महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली आज ठाणे महानगरपालिकेच्यावतीने प्रभाग क्र. 19 अंतर्गत हाजुरी परिसरात सर्वंकष स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.

या मोहिमेस उपायुक्त मधुकर बोडके, स्थानिक नगरसेवक विकास रेपाळे, राजेंद्र फाटक, नगरसेविका मीनल संख्ये, नम्रता भोसले, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, स्वच्छता निरीक्षक शयुराज कांबळे आदी उपस्थित होते.तसेच परिसरातील नागरिक देखील या स्वच्छता मोहिमेत उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.



स्वच्छतेची शपथ घेवून या मोहिमेस प्रारंभ करण्यात आला. सकाळी 8.00 वा. प्रभाग क्र. 19 अंतर्गत संकल्प चौक, रघुनाथ नगर, हाजुरी, जीलानीवाडी, नयनवाडी चौक ते जे.के बेकरी, अर्जुना पार्क, नुरी रोड, ग्रीन रोड, पप्पू ढाबा ते सुर्वेवाडी, हनुमान मंदिर ते मस्जिद मार्गे एकवीरा देवी मंदिर परिसरात डीप क्लीन ड्राईव्ह कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आला. या मोहिमेदरम्यान रस्त्यावर साचलेला रॅबिट कचरा, माती व अन्य घनकचरा उचलून स्वच्छता करण्यात आली. तसेच रस्ते पाण्याने स्वच्छ करण्यात आले.

महापालिकेचे सुमारे 150 कर्मचारी, फायलेरिया विभाग, गार्डन विभाग, मलनिस्सारण विभाग, 4 आर्यन वाहने, अतिक्रमण तसेच नौपाडा प्रभाग समितीचे लक्ष्मण पुरी यांनी देखील सक्रिय सहभाग नोंदविला. अस्वच्छता करणाऱ्या तसेच रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या व्यक्ती व आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येऊन रु. 12,000/- इतका दंड वसूल करण्यात आला.

यावेळी उपमुख्य स्वच्छता निरीक्षक राजेश वळवी, प्रवीण बनोटे तसेच स्वच्छता निरीक्षक कांतीराम गायकर, लतीकेश गाडेकर, विशाल खांबे, पंकज साळवे, सुभाष जमधाडे, अमित मोते हे कर्मचारी उपस्थित होते.

# मुरबाड बसस्टँडवरील दागिने चोरी प्रकरणी महिला अटकेत

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड(नरेंद्र पाटील) :** मुरबाड बसस्टँड परिसरात प्रवाशांच्या दागिन्यांची चोरी करणाऱ्या महिला आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. गर्दीचा फायदा घेत बसमध्ये चढताना महिलांच्या पर्समधील सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या टोळीतील ही महिला असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

दाखल तक्रारीनुसार, मुरबाड बसस्टँड येथे प्रवासादरम्यान गर्दीत धक्का लागल्याचा बहाणा करून अज्ञात व्यक्तीने महिलेकडील सोन्याचे दागिने चोरले होते. या प्रकरणी मुरबाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.



गुप्त माहितीवरून कारवाई गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने तपासाची सूत्रे हाती घेतली. गुप्त बातमीदारांच्या माहितीच्या आधारे संशयित महिला आरोपीचा शोध घेऊन तिला ताब्यात घेण्यात आले.

तपासादरम्यान आरोपीकडून सुमारे १ तोळे २.५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत. आरोपीकडून पुढील चौकशी सुरू असून, इतर गुन्ह्यांमध्ये तिचा सहभाग आहे का याचाही तपास केला जात आहे.

पोलीस पथकाचे कौतुक ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अत्यंत तत्परतेने व कौशल्यपूर्णरीत्या पार पाडली असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पथकाच्या कामगिरीचे कौतुक केले आहे. नागरिकांनी गर्दीच्या ठिकाणी प्रवास करताना मौल्यवान वस्तूंबाबत सतर्क राहावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# जिल्हास्तरीय मास्टर्स कप क्रिकेट स्पर्धा संपन्न

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** पोलीस हवालदार स्वर्गीय यशवंतराव ओंबासे यांच्या स्मरणार्थ आयोजित मास्टर्स कप चॅम्प्स टी-20 स्मृती चषक राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेत पनवेलच्या करण क्रिकेट अकॅडमी या संघाने शानदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले.

ही स्पर्धा प्रतिवर्षी 11 वर्षाखालील युवा खेळाडूंसाठी आयोजित करण्यात येते. ही स्पर्धा दोन गटांमध्ये खेळवण्यात आली. स्पर्धेत ठाणे जिल्ह्यातील 18 संघाला प्रवेश देण्यात आला होता. ही स्पर्धा कल्याणच्या संतोष स्पोर्ट्स क्रिकेट अकॅडमीच्या क्रीडांगणावर घेण्यात आली. स्पर्धेचे आयोजन संतोष स्पोर्ट्स क्रिकेट अकॅडमी, कल्याण व स्पोर्ट्स केअर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने





करण्यात आले होते. अंतिम सामना पनवेल करण अकॅडमी आणि ठाणे येथील श्री मा गुरुकुल स्कूल यांच्यात रंगला. नाणेफेक जिंकून करण अकॅडमीने प्रथम फलंदाजी स्वीकारली. २० षटकांत ११८ धावा करत ११९ धावांचे आव्हान श्री माँ गुरुकुल ठाणे समोर ठेवले.

लक्ष्याचा पाठलाग करताना श्री माँ गुरुकुल ठाणे संघाला करण क्रिकेट अकॅडमीच्या भेदक गोलंदाजीसमोर टिकाव धरता आला नाही. उत्कृष्ट गोलंदाजी व शिस्तबद्ध क्षेत्ररक्षणाच्या जोरावर करण क्रिकेट अकॅडमीने श्री माँ गुरुकुल ठाणे संघाला विजयाच्या लक्ष्यापासून दूर ठेवत विजेतेपद मिळवले. श्री माँ गुरुकुल ठाणे संघाने उपविजेतेपद मिळवले. तर पियुष दांडेकर हा सामनावीर ठरला. पारितोषिक वितरण समारंभाला संतोष स्पोर्ट्स क्रिकेट अकॅडमी सचिव संतोष पाठक, केअर फाउंडेशन अध्यक्ष अविनाश ओंबासे, करण क्रिकेट अकॅडमी सचिव व प्रशिक्षक करण सर, श्री माँ गुरुकुल ठाणे मुख्य प्रशिक्षक दर्शन भोईर, प्रशिक्षक अजय, संतोष स्पोर्ट्स क्रिकेट अकॅडमी मुख्य प्रशिक्षक परेश हिंदुराव, मंगेश ब्रीद आदी मान्यवर उपस्थित होते.

कल्याण डोंबिवली मध्ये क्रिकेट खेळाची आफाट लोकप्रियता असून लहान मुलांमध्ये टॅलेंट आहे. ते हेरून जिल्ह्यातील छोट्या क्रिकेटपटूंना योग्य संधी मिळावी तसेच अशा स्पर्धेच्या माध्यमातून खेळाडूंना आपली गुणवत्ता सिद्ध करावी हा उद्देश या स्पर्धेचा आहे असे आयोजक संतोष पाठक यांनी सांगितले.

# महिला दिनी 'अहिल्या-जागर स्त्रीशक्तीचा' उपक्रमांचे आयोजन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** या वर्षी 8 मार्च रोजी म्हणजेच जागतिक महिला दिनी करावयाच्या कार्यक्रमांची रुपरेषा ठरविण्यासाठी आज महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांचे दालनात बैठक संपन्न झाली. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या 300 व्या जयंतीचे औचित्य साधून "अहिल्या - जागर- स्त्री शक्तीचा" या मथळ्याखाली विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याबाबतच्या सूचना सदर बैठकीत महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या. या समयी अतिरिक्त शहर अभियंता (यांत्रिकी, विद्युत) प्रशांत भागवत, महापालिका सचिव किशोर शेळके, उप आयुक्त वंदना गुळवे, प्रसाद बोरकर, रामदास कोकरे, कांचन गायकवाड, मुख्य उद्यान अधिक्षक संजय जाधव, वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. दिपा शुक्ला, डॉ. पुर्णिमा ढाके, सहा. आयुक्त सुषमा मांडगे, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, समाज विकास अधिकारी प्रशांत गवाणकर, मुख्य स्वच्छता अधिकारी अगस्तिन घुटे उपस्थित होते.

या वर्षी महिला दिनाचे औचित्य साधून खालीलप्रमाणे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

- दि. 06ते 08मार्च रोजी कल्याण (प.) येथील सिटी पार्क येथे महिला बचत गटामार्फत खाद्य पदार्थ विक्री व इतर स्टॉल्सचे आयोजन
- (अ) दि. 07 मार्च रोजी इयत्ता 8 वी, 9 वी व 11 वी तील किशोरवयीन विद्यार्थीनींकरिता समुपदेशन व्याख्यानाचे आयोजन.
- (ब) *सर्व मनपा शाळांमध्ये हिपॅटायटीस-A लसीकरणाची मोहिमेचे आयोजन.
- (अ) दि. 08 मार्च रोजी सकाळच्या प्रहरात IMA व महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने रणरागिणी मॅराथॉन स्पर्धेचे आयोजन
- (ब) Lighthouse Commuities व महापालिकेमार्फत आंबिवली येथील कौशल्य विकास केंद्र येथे रोजगारप्राप्त महिलांचा मा. महापौर महोदया यांच्या शुभहस्ते सन्मान
- क) टाटा मेमोरियल हॉस्पिटल व महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने मिशन शक्ती मोहिमे अंतर्गत संशयित कॅन्सर ग्रस्त महिला रुग्णांकरीता विशेष कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन
- (ड)सायंकाळी 04:00 वाजल्यापासून सिटी पार्कमध्ये, महापालिका व सिटी पार्क मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने मध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन, कर्तुत्ववान महिलांचा सन्मान सोहळा
- (इ)महिला व बाल कल्याण विभागामार्फत खुल्या महिला बचत गटांना प्रातिनिधीक स्वरुपात अनुदान, तसेच निराधार/विधवा/ परितक्त्या/ घटस्फोटीत महिलांच्या कुटुंबातील विवाहयोग्य मुलींना विवाहाकरीता प्रातिनिधीक स्वरुपात अर्थसहाय्य अनुदान वितरण अशाप्रकारे अनेकविध कार्यक्रमाचा लाभ, महिला दिनानिमित्त महिलांना घेता येणार आहे.

दि. 08 मार्च रोजी होणाऱ्या कर्तुत्ववान महिलांच्या सन्मान सोहळयासाठी महापालिका क्षेत्रातील महिलांनी केलेल्या कामगिरीची संपूर्ण माहिती, कागदपत्रे ,अर्जासहित महिला व बाल कल्याण विभाग, महापालिका मुख्यालय, कल्याण (प)येथे दि. 27 फेब्रुवारी पर्यंत जमा करावीत असे आवाहन महिला व बाल कल्याण विभागाच्या उप आयुक्त कांचन गायकवाड यांनी केले आहे.

# भविष्यवेध



**गुरुवार**
**२६ फेब्रुवारी २०२६**

**मेष**
तुमच्या मुलाला चांगली नोकरी मिळाल्यावर तुमचे पालक खूप आनंदी होतील. तुम्हाला दीर्घकाळापासून असलेल्या आरोग्य समस्यांपासून मुक्तता मिळेल.

**वृषभ**
आज कोणाविरुद्धही द्वेष बाळगू नका. जसे विचार असतील तसे अनुभव येतील. आज हट्टीपणा टाळावा. मित्रांसोबत व्यवसाय सुरू करण्याची य़ोजना आखू शकता.

**मिथुन**
तुमचे सहकारी आणि वरिष्ठ तुमच्या कामगिरीवर खूश होतील आणि तुमची प्रशंसा करतील. तुम्ही सर्व महत्त्वाची कामे सहजपणे पूर्ण कराल.

**कर्क**
वडिलांनी तुम्हाला दिलेल्या व्यावसायिक जबाबदाऱ्या तुम्ही सहजपणे पूर्ण कराल. फर्निचर व्यवसायात असलेल्यांना अपेक्षेपेक्षा जास्त नफा मिळेल.

**सिंह**
कौटुंबिक बाबींबद्दल तुम्हाला शांतपणे विचार करण्याची आवश्यकता आहे, आणि निकाल तुमच्या बाजूने येतील. तुमचे भाऊ त्यांच्या कामात तुमची मदत मागतील.

**कन्या**
चांगल्या कामासाठी समाजात मान्यता मिळेल. वैद्यकीय विद्यार्थ्यांना त्यांच्या वरिष्ठांकडून पाठिंबा मिळेल. कामात खूप रस असेल, नव्या कल्पना सुचतील.

**तुळ**
काही सर्जनशील कामावर लक्ष केंद्रित कराल, ज्यामुळे अनुभव आणखी वाढेल. काही विरोधक तुमच्या कामात अडचणी निर्माण करण्याचा प्रयत्न करू शकतात.

**वृश्चिक**
जोडीदाराप्रती वर्तन सुधारावे लागेल. एखाद्याला पैसे उधार देण्यापूर्वी काळजीपूर्वक विचार करणे चांगले. निर्णयांवर प्रभाव पडू नये याची काळजी घ्या.

**धनु**
पैसे कुठे खर्च होत आहेत यावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे, अन्यथा तुम्हाला भविष्यात पैशांची आवश्यकता भासू शकते. अनावश्यक गुंतागुंत टाळण्याची

**मकर**
आवश्यकता आहे. तुम्ही सामाजिकदृष्ट्या खूप सक्रिय असाल. काहीतरी नवीन करण्याची तुमची इच्छा पूर्ण होऊ शकते. मुले आज तुमच्या अपेक्षा पूर्ण करतील.

**कुंभ**
खाजगी नोकरी करणाऱ्या व्यक्ती त्यांच्या कामावर पूर्ण लक्ष केंद्रित करतील. व्यवसाय थोडा मंदावू शकतो, परंतु नंतर चांगला नफा तुम्हाला खूप आनंद देईल.

**मीन**
नवीन वाहन खरेदी करण्याचे तुमचे स्वप्न आज पूर्ण होईल. आयुष्यात संतुलन राखण्याचा प्रयत्न कराल. आज तुमची कामे योग्यरित्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करा.

# वाहतूक पोलिसांच्या गस्तीत रिक्षातून शस्त्रसाठा जप्त

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली :** शहर वाहतूक पोलिस सोमवारी पश्चिमेकडील भागात गस्त घालत असताना निष्काळजीपणे रिक्षा चालविणाऱ्या चालकाची आणि त्याच्या साथीदाराची अंगझडती घेतली असता दोघांकडे धारदार शस्त्रे आढळली. दोघांना अटक करून त्यांना विष्णुनगर पोलिसांच्या हवाली केले. वाहतूक विभागाचे पोलिस अधिकारी श्रीराम पाटील, अनंत कदम आणि अन्य कर्मचारी पश्चिमेकडील महात्मा फुले रोड या ठिकाणी गस्त घालत होते. त्यावेळी एक रिक्षाचालक त्याच्या ताब्यातील रिक्षा निष्काळजी चालवत असल्याचे निदर्शनास पडले..

# सामाजिक कार्यकर्तावर हल्ला करणाऱ्यांवर कारवाई करा

## इंदिरानगर संघर्ष रहिवासी संघटनेची पोलिसांकडे मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : टिटवाळा पुर्व येथील इंदिरानगर स्मशानभूमी रस्ता विभागात सामाजिक कार्यकर्ते महेन्द्र शेजुळ हे गेले १५ वर्षांपासून राहणारे असून गेल्या ८ वर्षांपासून परिसरातील सामाजिक कामे जनतेची सेवा सर्वांशी मनमिळावू स्वभावामुळे त्यांची ओळख होती. मात्र २१ फेब्रुवारी रोजी त्यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात शेजूळ जखमी झाले आहेत. या प्रकरणी दोषी असणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी इंदिरानगर संघर्ष रहिवासी संघटनेने पोलिसांकडे केली आहे. शेजूळ कामावरून घरी जात असताना अचानक अर्जुन शर्मा यांने आवाज दिला मागे वळून बघितले तितक्याच पाठीमागून त्यांचे आणखी दोन सहकारी यांनी धार-धार कोयत्याने वार करून जिवे मारण्यासाठीचा कट त्याचा अधिपासुनच प्लानिंग केला होता असे दिसून येते. महेंद्र जोरात ओरडल्या ने चाळीत राहणाऱ्यानी बचाव करण्यासाठी गेले असता त्यांच्या वर देखिल हल्ला करत तेथुन पळ काढला. यावेळी चाळीतील लोकांनी महेंद्र यांना रक्तस्राव चालू असलेल्या अवस्थेत उचलून रुग्णालयात दाखल केले असता त्यांची अवस्था अत्यंत चिंताजनक असून पुढील उपचार सुरू आहेत. हि घटना माहिती पडताच परिसरात हळहळ व्यक्त होत असुन भितीचे वातावरण निर्माण झाले आहे व आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी यासाठी संघर्ष रहिवासी संघटना इंदिरानगर मार्फत स्थानिक पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आले असून हल्ला करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# पाच मोटारसायकलींना मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञाताने आग लाऊन पेटवल्या

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी शहरातील नारपोली भंडारी चौक अनंता नगर येथील निवासी परिसरात रात्री रस्त्यावर उभ्या करून ठेवलेल्या पाच मोटरसायकल मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञाताने आग लावण्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे.या प्रकरणी पोलिसांनी अज्ञातां विरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरु केला आहे..




या भिषण आगीमध्ये या पाचही मोटारसायकली जळून खाक झाली आहेत. ही आग नक्की कोणत्या कारणासाठी कोणत्या वादातून लावली याचं कारण अद्याप अस्पष्ट आहे.

आगीची धग लागल्यानंतर स्थानिकांनी घरातील पाणी ओतून ही आग आटोक्यात आणली,तोपर्यंत सर्व दुचाकींचे जळून नुकसान झाले आहे.याप्रकरणी स्थानिक भोईवाडा पोलीस ठाणे या ठिकाणी अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस तपास करीत आहेत.

# ऑनलाइन गेमिंगवर कडक कारवाईची मागणी निरंजन डावखरे विधानपरिषदेत आक्रमक

## - आमदार अ‍ॅड. निरंजन डावखरे यांची विधानपरिषदेत आक्रमक मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई(२५)** : ऑनलाइन गेमिंगचे व्यसन हे सध्याच्या पिढीसाठी विनाशाचे कारण ठरत असून, या जीवघेण्या खेळामुळे अनेक कोवळया जीवांनी आत्महत्या केल्याच्या घटना समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर, कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार अ‍ॅड. निरंजन डावखरे यांनी आज विधानपरिषदेत हा गंभीर प्रश्न उपस्थित करून सरकारचे लक्ष वेधले. केवळ अशा गेम्सवर बंदी घालून चालणार नाही, तर या गेम्सद्वारे तरुणांना मृत्यूच्या दारात ढकलणाऱ्या कंपन्यांच्या मालकांवर भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १०८ (आत्महत्येला प्रवृत्त करणे) अंतर्गत गुन्हे दाखल करण्याची आक्रमक मागणी त्यांनी सभागृहात केली.



कोवळया जीवांच्या आत्महत्यांचा दिला दाखला आमदार अ‍ॅड. निरंजन डावखरे यांनी सभागृहात पुणे, मुंबई, संभाजीनगर आणि अगदी अलीकडील गाझियाबादमधील घटनांचा उल्लेख केला. "पुण्यात अवघ्या १५ वर्षांच्या मुलाने आत्महत्या केली आणि चिठ्ठीत फक्त 'लॉग आऊट' (Log Out) असे लिहिले. मुंबईत १४ वर्षांच्या मुलीने आई-वडिलांनी गेम खेळू दिला नाही म्हणून टोकाचे पाऊल उचलले, तर संभाजीनगरमध्ये एका युवकाने साडेतीन लाख रुपये हरल्यामुळे स्वतःला संपवले. अलीकडेच गाझियाबादमध्ये तीन बहिणींनी गेममधील 'टास्क' पूर्ण करण्यासाठी एकत्रित उडी मारून जीवन संपवले," असे हृदयद्रावक दाखले देत आमदार अ‍ॅड. निरंजन डावखरे यांनी या प्रश्नाची दाहकता मांडली.

विकृत मानसिकतेवर कडक प्रहार करा आमदार अ‍ॅड. निरंजन डावखरे म्हणाले की, "हे गेमिंग अ‍ॅप्स बनवणारे लोक विकृत आहेत. ते एका नावाने गेम बॅन झाला की दुसऱ्या नावाने तोच गेम पुन्हा आणतात. 'ब्लू व्हेल' गेला की 'ब्लॅक व्हेल' येतो. ही साखळी तोडण्यासाठी केवळ प्रतिबंधात्मक उपाय पुरेसे नाहीत. या कंपन्यांच्या मालकांवर थेट कठोर फौजदारी कलमांखाली कारवाई व्हायला हवी. तरुणांच्या आयुष्याची सुवर्ण सकाळ फुलण्याऐवजी त्यांना मृत्यूच्या काळोखात ढकलण्याचे काम हे प्लॅटफॉर्म करत आहेत."

सरकारची भूमिका आणि टास्क फोर्स आमदार अ‍ॅड. निरंजन डावखरे यांच्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना माहिती तंत्रज्ञान मंत्री अ‍ॅड. आशिष शेलार यांनी या विषयाचे गांभीर्य मान्य केले. सरकारने २ फेब्रुवारी २०२६ रोजी एक उच्चस्तरीय 'टास्क फोर्स' स्थापन केला असल्याची माहिती त्यांनी दिली. यामध्ये मानसोपचार तज्ज्ञ, आयटी एक्सपर्ट्स आणि पोलीस यंत्रणेचा समावेश असून, ऑनलाइन गेमिंगचा शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम, डिजिटल जाहिरातींचा प्रभाव आणि आंतरराष्ट्रीय नियम यावर सखोल अभ्यास केला जात आहे.

पुढील पावले: आमदार अ‍ॅड. निरंजन डावखरे यांच्या आग्रही मागणीनंतर, सरकारने या टास्क फोर्सचा अहवाल आगामी अधिवेशनापूर्वी सादर करण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच, न्याय विभागाचा सल्ला घेऊन अशा गेमिंग कंपन्यांवर 'आत्महत्येला प्रवृत्त' केल्याचा गुन्हा नोंदवता येईल का, यावर सकारात्मक कायदेशीर पावले उचलली जातील, असेही सरकारने स्पष्ट केले. ऑनलाइन गेमिंगच्या या महाभयंकर संकटातून महाराष्ट्रातील तरुणाईला वाचवण्यासाठी आमदार अ‍ॅड.निरंजन डावखरे यांनी पुकारलेल्या या लढ्याचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

# कल्याण पूर्वेत बारावीच्या विद्यार्थिनीची आत्महत्या

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत एका 17 वर्षीय महाविद्यालयीन तरुणीने राहत्या घरी आत्महत्या केली आहे. ही तरुणी 'बारावी कॉमर्स'मध्ये शिक्षण घेत होती. सध्या सुरू असलेल्या बारावीच्या परीक्षेत आपल्याला अपयश येईल, आपण उत्तीर्ण होणार नाही, या प्रचंड मानसिक दडपणाखाली तिने हे टोकाचे पाऊल उचलले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आत्महत्या करण्यापूर्वी या तरुणीने एक चिठ्ठी लिहून ठेवली होती. यामध्ये तिने आपल्या मनातील भीती आणि पालकांविषयीच्या भावना व्यक्त केल्या आहेत. तिने म्हटले आहे की, मी गेल्यावर आई-बाबा त्रास करुन घेऊ नका. या चिठ्ठीमुळे परीक्षांच्या काळात विद्यार्थ्यांवर असलेल्या मानसिक दबावाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. कोळसेवाडी पोलिसांनी या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. ही आत्महत्या केवळ परीक्षेच्या भीतीतून झाली आहे की यामागे काही वैयक्तिक किंवा अन्य कारण आहे, या अंगाने पोलीस तपास करत आहेत.

# तानपुरा आणि त्याचे हिंदुस्थानी संगीतातील महत्व आणि त्याचे सप्रयोग व्याख्यान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : "तानपुरा आणि त्याचे हिंदुस्थानी संगीतातील महत्व आणि त्याचे सप्रयोग व्याख्यानाचे आयोजन रविवार दिनांक 1 मार्च रोजी सकाळी 9.30 ते 1.30 वाजेपर्यंत कल्याण पश्चिमेतील टिळक चौक येथील कल्याण गायन समाज याठिकाणी करण्यात आले आहे. भारतीय शास्त्रीय संगीतात तानपुराचे अनन्यसाधारण महत्त्व आहे .पूर्वीच्या काळी अकोस्टीक तानपुरा हा एक अविभाज्य घटक होता. टेक्नॉलॉजी मुळे आजकाल अकोस्टीक तानपुराचा वापर कमी होऊन इलेक्ट्रॉनिक तानपुराचा वापर खूप जास्त प्रमाणात होऊ लागला आहे. जरी इलेक्ट्रॉनिक तानपुरा हा एक अतिशय उत्तम पर्याय असला तरी अकोस्टीक तानपुराची जागा हा नक्कीच घेऊ शकत नाही. याचेच महत्त्व परत एकदा विशद करावे आणि तानपुरा या वाद्याबद्दल बाळासाहेब मिरजकर या एका जाणकार व्यक्तीकडून माहिती घ्यावी म्हणून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कल्याण डोंबिवली परिसरातील सर्व संगीत साधक आणि विद्यार्थी या व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद देतील याची खात्री आहे असे आयोजक मनीषा घारपुरे यांनी सांगितले. कल्याण गायन समाजाने आपल्या शताब्दी वर्षात हा कार्यक्रम विनामुल्य उपलब्ध करुन दिला आहे. संपर्क : मनीषा घारपुरे - 9930500518

# होळी सणासाठी कोकणातील चाकरमान्यांसाठी एस.टी.च्या जादा गाड्या

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : कोकणातील चाकरमान्यांचा आवडता सण म्हणजे गणेशोत्सव आणि होळी (शिमगा) यानिमित्ताने मुंबई, ठाणे, पालघर येथील कोकणवासी आपल्या गावी जात असतात. यासाठी एसटीच्या जादा गाड्या सोडण्यात येणार आहेत. यावर्षी एस टी. महामंडळाने २७ फेब्रुवारी ते ५. मार्च पर्यत जादा गाड्यांची व्यवस्था मुंबई, बोरीवली, ठाणे, पुणे येथून करण्यात आली आहे.

यामध्ये बोरीवली-महाड,आंबेत, भांडूप-महाड, नालासोपारा खुटील, मुंबई-गोरेगाव, बोरीवाली, श्रीवर्धन तर प्रवासासाठी महाड बोरीवली सकाळी ६:४५ वा. महाड भांडुप दुपारी १३.००वा, खुटील नालासोपारा सकाळी ६.३० वा. श्रीवर्धन बोरीवली सकाळी ८:४५ वा. व अन्य गाड्या सोडण्यात येणार आहेत. तसेच रायगडमधील महाड पनवेल विना वाहक गाड्या , पेण- पनवेल, पेण खोपीली - पेण-नागोठणे, पेण अलिबाग श्रीवर्धन-पनवेल , कर्जत अलिबाग रोहा-पनवेल , मुरुड-अलिबाग पनवेल माणगाव-पनवेल (विनावाहक) अशा एकूण २७ जादा गाड्या रायगडच्या विविध डेपोतून सोडण्यात येणार आहेत. अशी माहिती एस.टी.कार्यालय रामवाडी येथून देण्यात आली.

# माळशेज घाटाच्या पायथ्याशी शिवस्मारक उभारण्याची मागणी

## पंतप्रधान व मुख्यमंत्र्यांकडे पत्रव्यवहार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** :हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अरबी समुद्रातील प्रस्तावित स्मारकाऐवजी ते स्मारक माळशेज घाटाच्या पायथ्याशी, सावरणे गावाजवळ उभारण्यात यावे, अशी मागणी मुरबाड तालुक्यातील करचोंडे गावचे सामाजिक कार्यकर्ते रमेश घरत यांनी केली आहे.

यासंदर्भात त्यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्रव्यवहाराद्वारे सविस्तर निवेदन पाठवले आहे.

मुद्देसूद मागणी पुढीलप्रमाणे : अरबी समुद्रातील स्मारकाचा पुनर्विचार करून ते सह्याद्रीच्या सान्निध्यात उभारावे.

माळशेज घाटाच्या पायथ्याशी सावरणे परिसरात स्मारक उभारल्यास ऐतिहासिक आणि भौगोलिक सुसंगती साधली जाईल.

ग्रामीण व आदिवासी भागाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल.

पर्यटनवृद्धीमुळे स्थानिक युवकांना रोजगारनिर्मितीची संधी उपलब्ध होईल.

पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य व शिक्षण क्षेत्रात सुधारणा होईल.

शासनाने तज्ज्ञ समितीमार्फत व्यवहार्यता अहवाल तयार करून सकारात्मक निर्णय घ्यावा.

रमेश घरत यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, शिवरायांचे कार्य सह्याद्री पर्वतरांगांशी घट्ट जोडलेले असून त्यांच्या स्मारकाचे स्थानही त्या ऐतिहासिक भूमीत असणे अधिक प्रेरणादायी ठरेल.

या मागणीमुळे शिवस्मारकाच्या स्थानाबाबत नव्याने चर्चा सुरू झाली असून शासनाची भूमिका काय राहते, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# एनएमएमएस परीक्षेत ठाणे मनपा शिक्षण विभागाचे अभिमानास्पद यश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : सन 2007 -08 पासून राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा ही मानव संसाधन विकास मंत्रालय नवी दिल्ली यांच्या मार्फत राबवली जात आहे. आर्थिक मागास विद्यार्थ्यांमधून प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांच्या प्रज्ञेची जोपासना तसेच त्यांचे बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण व्हावे हे या योजनेचे उद्दिष्टये आहे. प्रज्ञावन विद्यार्थ्यांना दरमहा शिष्यवृत्तीच्या स्वरूपात आर्थिक मदत करण्यात येते. सदर शिष्यवृत्ती १२वी पर्यंत मिळते. सन 2017 -18 पासून शिष्यवृत्तीचे दर दरमहा 1000 (वार्षिक 12000 ) आहे. इयत्ता आठवीतील आर्थिक दुर्बल घटकातील ज्या पालकांचे उत्पन्न 3500 पेक्षा कमी आहे व ची विद्यार्थिनी अनुदानित शाळेत शिकत असतात त्या विद्यार्थ्यांना परीक्षेतील गुणवत्तेच्या आधारे सदरचे वाटप होते महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यामार्फत दिनांक 28 डिसेंबर 2025 रोजी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा ची विद्यार्थ्यांना प्राप्त गुणांची यादी परिषदेच्या संकेतस्थळावर दिनांक 24 फेब्रुवारी 2020 पासून प्रकाशित करण्यात आलेली आहे.




यामध्ये ठाणे महानगरपालिका अंतर्गत शिक्षण विभागाने पुन्हा एकदा शैक्षणिक गुणवत्तेचा झेंडा उंचावला आहे. राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना (NMMS) या परीक्षेत ठाणे महानगरपालिका शाळेतील विविध विभागांतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून ठाणे शहराचा मान वाढवला आहे.

यामध्ये गट क्रमांक ०३ कळवा विभागातील २ विद्यार्थी, गट क्रमांक ०५ मुंब्रा विभागातील ६ विद्यार्थी तसेच गट क्रमांक ०२ कोपरी विभाग २ आणि गट क्रमांक ०६ मानपाडा विभागातील ३ विद्यार्थ्यांनी ही शिष्यवृत्ती परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली आहे. एकूण १३ विद्यार्थ्यांच्या या यशामुळे मनपा शिक्षण विभागाची गुणवत्ता पुन्हा अधोरेखित झाली आहे. या विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि शिक्षकांच्या प्रभावी मार्गदर्शनाच्या जोरावर हे उल्लेखनीय यश मिळवले आहे. त्यांच्या या यशाबद्दल उपायुक्त (शिक्षण) डॉ. मिताली संचेती, शिक्षणाधिकारी शेषराव बडे तसेच गट अधिकारी संगीता बामणे यांनी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

मनपा शिक्षण विभागाच्या शाळांमधील दर्जेदार शिक्षण आणि शिक्षकांची बांधिलकी यामुळेच विद्यार्थ्यांना राज्य व राष्ट्रीय स्तरावर यश संपादन करता येत आहे. भविष्यातही अशीच उज्ज्वल कामगिरी करत ठाणे शहराचे नाव राज्य आणि देशपातळीवर अधिकाधिक झळकावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. ठाणे मनपा शिक्षण विभागाचे हे यश खऱ्या अर्थाने प्रेरणादायी ठरले असून इतर विद्यार्थ्यांसाठीही मार्गदर्शक ठरणार आहे.

# बंद पडणाऱ्या शाळा व अतिरिक्त होणाऱ्या शिक्षकांना मिळणार दिलासा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : कोकण विभागातील दुर्गम, डोंगराळ, सागर किनारपट्टी भागातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी होत असल्याने अनेक मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडण्याच्या अवस्थेमध्ये होत्या. त्यासाठी मंत्री उदय सामंत, मंत्री नितेश राणे, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, आमदार किरण सामंत, आमदार महेंद्र दळवी यांच्या उपस्थितत शिक्षण मंत्री दादा भुसे यांचे दालनात शिक्षण विभागाचे



सर्व अधिकाऱ्यांसमवेत बैठक संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये दोन्ही मंत्री आणि आमदार यांनी कोकणातील भौगोलिक परिस्थितीची, लोकसंख्येची बाजू मांडून विद्यार्थी संख्या कमी का त्याचे कारण समजावून दिले, तसेच शाळांच्या अंतरामध्ये असलेली वस्तुस्थिती पाहिली पाहिजे. या सर्व गोष्टींचा विचार करून विद्यार्थी संख्येचे निकष शिथिल करा अशी जोरदार मागणी केल्यानंतर पहिली ते आठवीच्या वर्गात कितीही विद्यार्थी असले तरी शिक्षक एक मंजूर होणार तसेच नववी दहावीच्या वर्गात किमान 10 विद्यार्थी एका वर्गात असल्यास शिक्षकाचे पद मंजूर होईल. अशा प्रकारचा दिलासादायक निर्णय झाला.

त्यामुळे कोकण विभागातील अनेक मराठी माध्यमाच्या शाळेतील बंद पडणारे वर्ग वाचतील तसेच अतिरिक्त होणाऱ्या शिक्षकांना दिलासा मिळालेला आहे. हा निर्णय महाराष्ट्रातील आणि जिल्ह्यांमध्ये लागू होईल. या निर्णयामुळे शिक्षण मंत्री दादाजी भुसे, मंत्री उदयजी सामंत, मंत्री नितेशजी राणे, कोकणाचे शिक्षक आमदार आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे सर, आमदार किरण सामंत, आमदार महेंद्र दळवी यांचे सर्व स्तरातून आभार मानले जात आहे. यावेळी रत्नागिरी मुख्याध्यापक संघाचे पदाधिकारी, संदेश राऊत, मुल्ला सर, पाटकर सर, टिडीएफ संघटनेचे अध्यक्ष सागर पाटील, प्राथमिक संघटनेचे देवळेकर सर व अन्य संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत राजा शिवाजी विद्यामंदिरचे विद्यार्थांनी मारली बाजी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : इयत्ता आठवीतील विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे मार्फत-राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा एन.एम.एम.एस (National Means Cum Merit Scholarship) घेण्यात आली होती. या परीक्षेत महात्मा फुले एज्युकेशन सोसायटी संचलित राजा शिवाजी विद्यामंदिर लोकमान्यनगर नंबर-4 ठाणे(प) (माध्यमिक विभाग) या शाळेतील 49 विद्यार्थ्यांपैकी एकूण 35 विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवून NMMS परीक्षा पास झाले आहेत. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे, संस्थापक देवकर सर, संस्था अध्यक्षा देवकर मॅडम, मुख्याध्यापक घाडगे जे.पी., पर्यवेक्षक गोरड आर.आर., सर्व पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, हितचिंतक यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

**परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी :**

1.दिव्येश जितेंद्र धुमाळ = 120
2.रिया बाळू राऊत = 118
3.रिया संतोष आर्डे = 115
4.संस्कृती बंडू भाळशंकर = 104
5.मनस्वी सचिन शितोळे = 103
6.रूचिता पंकज भदाणे = 97
7.युजेफ जुबेर शेख = 93
8.अंतरा बापू राणे = 92
9.तनश्री कांतीलाल राठोड = 91
10.अनन्या जितेंद्र राणे = 90
11.विवेक जयराम राठोड = 90
12.तेजश्री बाबासाहेब गवारे = 90
13.साईराज संतोष काकडे= 89
14.रिया भरत पाटेकर = 87
15.अथर्व गणेश नलावडे = 87
16.संस्कृती उमेश वीर = 86
17.सिद्धी नामदेव भोसले = 85
18.स्वरा पंकेश दळवी = 82
19.ज्ञानेश्वरी गणेश मुंढे = 81
20.सिद्धी विजय राऊळ = 81
21.आर्यन बळीराम राठोड = 79
22.पृथ्वीराज रामकृष्ण मंदावाड = 79
23.दक्ष दत्ताराम कदम = 77
24.समृद्धी शिवाजी सुर्वे = 77
25.श्रावणी रविंद्र भिलारे = 76
26.श्लोक विनोद निगुडकर = 76
27.किमया बाळाराम शिंदे = 76
28.जानवी बबन गंदगे = 75
29.अर्थव नाभदेव निपूर्ते = 73
30.शिवराम महेश नाईक = 73
31.प्रज्ञा संघपाल गायकवाड = 71
32.प्रशिक प्रसाद गाडे = 67
33.अमृता प्रकाश सदाफुले = 67
34.गणेश काळूसिंग पावरा = 65
35.भूमी संजय काळे = 61





ठाणे ■ गुरुवार
२६ फेब्रुवारी २०२६
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता




# पेण ग्रोथ सेंटर म्हणजे कोकणावर लादलेला अन्यायकारक विकास : राजेंद्र झेमसे

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : कोकणावर सातत्याने लादल्या जाणाऱ्या तथाकथित विकास धोरणांमुळे हा प्रदेश विकासाचा लाभार्थी न राहता बळी ठरत असल्याचा घणाघाती आरोप पेण तालुक्यातील वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र झेमसे यांनी केला आहे. “विकास” हा शब्द रोजगार, समाज व पर्यावरणाच्या चौकटीतून बाहेर काढून केवळ सिमेंट, रिअल इस्टेट व गुंतवणूकदारकेंद्री बनवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. मुंबई महानगर क्षेत्रातील लोकसंख्या, वाहतूक, पाणीटंचाई व प्रदूषणाचे प्रश्न न सोडवता तेच अपयशी विकास मॉडेल पेण ग्रोथ सेंटरच्या माध्यमातून ग्रामीण भागावर लादले जात असल्याचे त्यांनी नमूद केले. यामुळे सुपीक जमीन, शेती, पर्यावरण व स्थानिक अर्थव्यवस्थेचा ऱ्हास होणार असून स्थानिक नागरिक आपल्या जमिनीतच परके ठरण्याची भीती व्यक्त करण्यात आली. असमतोल विकासाला विरोध पेण ग्रोथ सेंटर रद्द करून मुंबई महानगर क्षेत्रातील नवीन निवासी प्रकल्पांना स्थगिती द्यावी, तसेच उद्योग व रोजगार राज्यातील इतर भागांत वळवावेत, अशी ठाम मागणी झेमसे यांनी केली. हा लढा विकासविरोधी नसून अन्यायकारक व असंतुलित विकासाविरोधातील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# कुंभारखाणपाडा स्मशानभूमी समस्या सुटली नाही तर आंदोलन



## भाजप पदाधिकारयांचा सहाय्यक आयुक्तांना इशारा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : डोंबिवली पूर्वकडील शिवमंदिर येथील स्मशानभूमीच्या नूतनीकरणाचे काम सुरू असल्यामुळे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आवाहनानुसार डोंबिवली पश्चिम येथील कुंभारखाणपाडा येथील स्मशानभूमीत पार्थिवावरती अंत्यसंस्कार करावेत असे सांगण्यात आले. मात्र या स्मशानभूमीवर अंतविधीसाठी लागणाऱ्या सुविधाचा आभाव असून सदर ठिकाणी सुरक्षा रक्षक तैनात नाही आहे. कुंभारखाणपाडा मोक्षधाम स्मशानभूमीत अनागोंदी कारभाराबाबत मंगळवारी प्रभागक्षेत कार्यालयात माजी नगरसेवक प्रकाश भोईर, संदीप म्हात्रे, प्रशांत पाटेकर, मनोज वैद्य, विशाल पारखे, जयप्रकाश सावंत,पवन मोरे आणि इतर भाजप पदाधिकारी प्रभागक्षेत्र अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांची भेट घेऊन त्यांना रीतसर पत्र दिले.

कुंभारखाणपाडा मोक्षधाम स्मशानभूमीत २४ तास कर्मचारी आणि सुरक्षा रक्षक नियुक्त करून अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्यांना मूलभूत सोयीसुविधा द्यायलाच पाहिजेत अशी मागणी भाजप पदाधिकारी यांनी पालिकेकडे दिली आहे. जर याकडे पालिकेने लक्ष दिले नाहीतर आंदोलन केले जाईल इशारा देण्यात आला आहे. या स्मशानभूमीत २४ तास उपलब्ध राहतील असे कर्मचारी नाहीत. अलीकडेच येथे दोन पार्थिव अंत्यसंस्कारासाठी आणले असता स्मशानभूमीला कुलूप होते. ज्यामुळे एका कुटुंबाला दुसऱ्या स्मशानभूमीत जावे लागले. ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे अशी प्रतिक्रिया माजी नगरसेवक प्रकाश भोईर यांनी दिली आहे.

स्मशानभूमीत पूर्णवेळ सुरक्षा रक्षक नसल्यामुळे स्मशानभूमीच्या मालमत्तेचे नुकसान होण्याची भीती आहे, तसेच रात्रीच्या वेळी येथे असुरक्षित वातावरण असते. स्मशानभूमीत पाण्याची तीव्र टंचाई आहे. स्वच्छतागृहे अत्यंत अस्वच्छ असून त्यांची नियमित सफाई केली जात नाही, असे भोईर यांनी सांगितले..

# कल्याणमध्ये महाराष्ट्र केसरी कुस्तीची निवड चाचणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा व महाराष्ट्र केसरी, किताबाची लढत२०२५/२६या स्पर्धेसाठी पात्र पैलवानांची निवड चाचणी कल्याण डोंबिवली परिसरातील जय गावदेवी कुस्ती संकुल पिसवली, गुलमोहर बंगला चेतना स्कुलच्या मागे येथे होणार असून यांचा खेळाडूंनी लाभ घ्यावा असे अवाहन मोहन खोपडे, सचिव, महाराष्ट्र राज्य भारतीय शैली कुस्ती संघ यांनी केले आहे. महाराष्ट्र राज्य भारतीय शैली(माती)कुस्ती संघ यांच्या मान्यतेने व पै. प्रकाश बापू जगताप प्रतिष्ठांन सासवड यांचे वतीने दिनांक १२ते१५मार्च२०२६या कालावधीत पुणे जिल्ह्यातील सासवड येथे मातीवरील'महाराष्ट्र केसरी, कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी अनेक जिल्ह्याचे संघ सहभागी होणार आहेत, त्याप्रमाणे ठाणे जिल्हा कल्याण डोंबिवली परिसरातील संघ देखील स्पर्धेत उतरणार आहे, याकरिता निवड चाचणी घेऊन संघ प्रवेशिका५मार्च२०२६पर्यंत महाराष्ट्र राज्य भारतीय शैली(माती)कुस्ती संघाकडे पाठवायचे आहेत.वजन गटाचा विचार केला तर,५५ किलो ,६० किलो,६५ किलो,७० किलो,७५ किलो,८० किलो,८५ किलो,९० किलो तर महाराष्ट्र केसरी साठी ८५ ते १४० किलो असा असणार आहे, खेळाडू चे वय २० पेक्षा जास्त असावे, १८/१९ वर्षाच्या खेळाडू साठी वैद्यकीय प्रमाणपत्र, पालकांचे संमती पत्र, आधारकार्ड, पासपोर्ट, जन्म दाखला इत्यादी कागदपत्रे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे. विजेत्या खेळाडू करिता बक्षिसांची रेलचेल असून महाराष्ट्र केसरी साठी विशेष बक्षीस म्हणून प्रथम क्रमांक थार गाडी, द्वितीय, सियारा, गाडी, तृतीय क्रमांक ला बुलेट, चतुर्थ क्रमांक हिरोहोंडा शिवाय आकर्षक रोख बक्षिसे दिली जाणार आहेत. यासाठी कल्याण डोंबिवली शहराची(माती विभाग) निवड चाचणी २८ फेब्रुवारी सांयकाळी ५ वाजता वजन घेण्यात येईल तर १ मार्च २०२६ रोजी कुस्ती निवड चाचणी घेण्यात येणार असल्याचे कळविण्यात आले आहे. कल्याण जवळील पिसवली येथील जय गावदेवी कुस्ती संकलात ही निवड चाचणी होईल शिवाय काही अडचण आल्यास ९७०२७७५०५०/९७०२८०७७३१या क्रमांकावर संपर्क साधावा असे महाराष्ट्र राज्य कुस्ती शैली(माती)चे रंगराव हरणे यांनी कळविले आहे, त्यामुळे कल्याण डोंबिवली परिसरातील पैलवानांना ही सुवर्ण संधी असल्याचे बोलले जात आहे.

# ‘हिंद की चादर’ समूहगानाची वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**बदलापूर** : “समूहगायनाच्या माध्यमातून ‘हिंद दी चादर’ श्री गुरु तेग बहादूरजी यांच्या महान बलिदानाचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवून सामाजिक ऐक्य, सद्भावना आणि राष्ट्रीय एकात्मतेला बळ मिळेल,”

गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त कोकण विभागात आयोजित करण्यात आलेल्या या भव्य समूहगान उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, त्याची 'Best of India Records' या संस्थेकडून ‘वर्ल्ड रेकॉर्ड’ म्हणून नोंद करण्यात आली कुळगाव बदलापूर नगरपरिषद अखत्यार्यातील सर्व खाजगी अनुदानित विनाअनुदानित शाळांनी सकाळी ९.०० वाजता शासकीय व खाजगी शिक्षण संस्थांमध्ये एकाच वेळी हे विशेष समूहगान आयोजित करण्यात आले होते. सुप्रसिद्ध गायक सतिंदर सरताज यांनी गायलेले ‘हिंद की चादर’ हे गीत सुमारे 11000 विध्यार्थी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी एका सुरात गायले. यावेळी यावेळी शहराच्या नगराध्यक्षा सन्मानीय रुचिता घोरपडे नगरपालिकेचे उपमुख्याधिकारी श्री.केतन गुजर इतर अधिकारी व शिक्षक वृंद उपस्थित होते.

नगराध्यक्षा रुचितातार्इघोरपडे यांनी अशा उपक्रमांमुळे इतिहासातील महान व्यक्तिमत्त्वांचा त्याग, शौर्य आणि मूल्याधिष्ठित जीवन नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचते. गुरु तेग बहादूर यांनी धर्मस्वातंत्र्याच्या रक्षणासाठी दिलेले बलिदान हे संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी या ऐतिहासिक उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल सर्व शैक्षणिक संस्था, शिक्षक आणि प्रशासनाचे आभार मानले

येत्या २८ फेब्रुवारी आणि १ मार्च रोजी नवी मुंबईतील खारघर (सेक्टर २९, ओवे मैदान) येथे ३५० व्या शहिदी समागमानिमित्त भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या जनजागृतीसाठी आणि गुरु तेग बहादूरजींच्या बलिदानाचा इतिहास जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी हे समूहगानाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमामुळे सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश व्यापक स्तरावर पोहोचला आहे.

# शिक्षकांवर फौजदारी गुन्ह्यांची धमकी देऊ नये- सुधीर घागस

## शिक्षकांना अशैक्षणिक कामे देण्याच्या विरोधात शिक्षण क्रांती संघटनेचे आक्रमक पाऊल

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : महाराष्ट्र राज्य शिक्षण क्रांती संघटनेच्या नेतृत्वाखाली शिक्षकांना अशैक्षणिक कामे देण्याच्या सरकारी निर्णयाविरोधात तीव्र आवाज उठवण्यात आला आहे. संघटनेचे अध्यक्ष सुधीर घागस यांनी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांना पत्र लिहून शिक्षकांना बूथ लेव्हल ऑफिसर सारखी अशैक्षणिक कामे देण्याचा तीव्र विरोध केला आहे.



संघटनेचे म्हणणे आहे की, RTE Act २००९ च्या कलम २७ नुसार शिक्षकांना शैक्षणिक कामांव्यतिरिक्त अन्य कामे देणे बेकायदा आहे. यामुळे शिक्षकांचे ध्यान शिक्षणापासून विचलित होते व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. शिक्षकांना गैर-शैक्षणिक कामे करण्याची सक्ती प्रशासन करीत आहे व तसे न केल्यास त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची धमकीही दिली जात असल्याचे संघटनेचे आरोप आहेत. संघटनेच्या पत्रात शासन निर्णय क्र. पीआरआई-२०१०/ प्रक्र. २२५/प्राशि-१ दि. १८ जून, २०१० चा संदर्भ दिला आहे, ज्यात दशवार्षिक जनगणना,सार्वजनिक निवडणुका यांसारख्या कामांसाठी शिक्षकांची नियुक्ती केली जात असते त्यावर कोणताही विरोध नाही . पण BLO सारख्या ”अशैक्षणिक काम मुळे शिक्षकांना शाळेबाहेर राहावे लागत आहे.

संघटनेने पत्रातून जिलाधिकाऱ्यांकडे विनंती केली आहे की, शिक्षकांना अशैक्षणिक कामांपासून मुक्त करावे व विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे नुकसान टाळावे. यासाठी संघटनेने भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आमदार रविंद्र चव्हाण यांच्या सहयोगाची अपेक्षा व्यक्त केली आहे. या मुद्द्यावर सरकारचे काय उत्तर आहे हे जाणून घेण्यासाठी वृत्तांतर्गत तपास सुरू आहे. शिक्षकांच्या अधिकारांबाबत व शिक्षण व्यवस्था सुधारण्यासाठी संघटनेच्या मागण्यांचा प्रभाव काय असेल, यावर सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे.

# आयुक्त मनिषा आव्हाळेंकडून आरोग्य केंद्र व विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर** : दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी मा. आयुक्त सौ. मनिषा आव्हाळे भा.प्र.से यांनी उल्हासनगर महानगरपालिकाच्या वैद्यकीय आरोग्य विभागांतर्गत सेंट्रल व्हॅक्सिन स्टोअर तसेच नगरी आरोग्य केंद्र क्र. ५ (VTC ग्राऊंड) येथे भेट देऊन केंद्रातील कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी लसीकरणाची प्रक्रिया, औषधसाठा, उपलब्ध सुविधा व नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांची सविस्तर पाहणी करण्यात आली. संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देत नागरिकांना वेळेत व सुयोग्य सेवा देण्याबाबत निर्देशित करण्यात आले.. त्यानंतर मा. आयुक्त मॅडम यांनी शिवसेनेचे गटनेते व नगरसेवक यांच्या समवेत त्यांच्या प्रभागातील विविध ठिकाणी सुरू असलेल्या रस्ते दुरुस्ती व पाईपलाईन टाकण्याच्या कामांची प्रत्यक्ष स्थळी जाऊन पाहणी केली. कामांची गुणवत्ता, प्रगती तसेच सुरक्षिततेच्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. स्थानिक नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व संबंधित तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्याबाबत आश्वासन देण्यात आले. काही प्रलंबित बाबींविषयी संबंधित विभागप्रमुखांना त्वरित दूरध्वनी करून आवश्यक सूचना देण्यात आल्या. सदर पाहणीवेळी मा. उपआयुक्त श्री. अनंत जावदवार, वैद्यकीय विभागाच्या अधिकारी डॉ. मोहिनी धर्मा तसेच मोठ्या संख्येने नागरिकही यावेळी उपस्थित होते.

# महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची निवड



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद नगरपालिका महानगरपालिका सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्या पालघर जिल्हा अध्यक्षपदी वसई तालुक्यातील श्रीमती कॅथरीन परेरा यांची एकमताने निवड करण्यात आली असल्याचे पत्रक सरचिटणीस रामराव वर्हाड यांनी प्रसिध्दीस दिली आहे.

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद नगरपालिका महानगरपालिका सेवानिवृत्त शिक्षक संघटनेचे कार्यकारी मंडळाचे अधिवेशन २३ फेब्रुवारीला राज्याचे अध्यक्ष शिवानंद भरले यांच्या अध्यक्षतेखाली नेते विजय बहाकर यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर येथे संपन्न झाली.

या सभेत उस्मानाबाद जिल्ह्यातील बीबीशन पाटील यांची राज्य उपाध्यक्ष तर जिल्हाध्यक्ष म्हणून धनाजी शिवराम मुळे तर पालघर जिल्हा अध्यक्षपदी श्रीमती कॅथरीन फेलिक्स परेरा यांची एकमताने निवड करण्यात आली आहे या वेळी राज्य संघटनेचे कार्याध्यक्ष गोपाळ आगीवाले हरिभाऊ निसरड, शंकरराव सावंत, रमेश गायकवाड, सोमनाथ शेटे, पदाधिकारी व सभासद हजर होते.

# गोवेली येथे पथनाट्यातून रस्ता सुरक्षिततेचे धडे

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**गोवेली** : दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता जीवनदीप महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत जिल्हा परिषद शाळा गोवेली येथे “रस्ता सुरक्षा” या महत्त्वपूर्ण विषयावर पथनाट्य सादर करण्यात आले.



या पथनाट्यातून विद्यार्थ्यांनी वाहतूक नियमांचे पालन करण्याचे महत्त्व, हेल्मेट व सीटबेल्टचा वापर, मद्यपान करून वाहन चालविण्याचे दुष्परिणाम, तसेच मोबाईलचा वापर टाळण्याची गरज याबाबत प्रभावी संदेश दिला. आकर्षक संवाद आणि वास्तवदर्शी प्रसंगांमुळे उपस्थित विद्यार्थी व ग्रामस्थांवर सकारात्मक परिणाम झाला.कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.

जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे, संचालक. प्रशांत घोडविंदे, प्राचार्य .डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे, राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख. प्रा. दिनेश धनगर, प्रा. धनश्री नाईक यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या पथनाट्याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण होऊन अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी हातभार लागेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.






# विद्यार्थी रमले शब्दांच्या गावात

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**अंबरनाथ** : अंबरनाथ नगरपरिषद संचालित शिवप्रेरणा ग्रंथालय, अभ्यासिका आणि साहित्य संशोधन केंद्र आणि महात्मा गांधी विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय, अंबरनाथ यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच अंबरनाथ नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री. उमाकांत गायकवाड व नगराध्यक्ष मा. तेजश्री करंजुले-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली २७ फेब्रुवारी २०२६ मराठी भाषा गौरव दिनानिमित्त ”घेऊया एकच वसा, मराठीला बनवूया ज्ञानभाषा” या संकल्पनेवर आधारित सुप्रसिध्द वृत्त निवेदिका आणि सुसंवादक दीपाली केळकर यांच्या ”शब्दांच्या गावा जावे” या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महात्मा गांधी विद्यालयातील ८ वी आणि ९ वीचे सुमारे ४५० विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी झाले होते.





कार्यक्रमाच्या सुरवातीला मराठी संस्कृतीचे दर्शन घडवणारे नृत्य विद्यार्थीनीनी सादर केले. दीपाली केळकर यांनी मुलांशी संवाद साधताना शब्दांची विविध रूपे, त्यांचे स्वभाव अशी वैशिष्ट्ये सांगत मराठी ज्ञानभाषा होण्यासाठी विद्यार्थी म्हणून आपण काय करू शकतो हे सहज, सोप्या भाषेत सांगितले. ९ वीच्या पल्लवी डोंबाळे या विद्यार्थिनीने मराठी भाषेचा अभिमान का वाटतो आणि आपण मराठी भाषा जपण्यासाठी काय केले पाहिजे हे अत्यंत सुंदररित्या मांडले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करून आयोजन करण्याचे प्रयोजन शिवप्रेरणा ग्रंथालयाच्या ग्रंथपाल तपस्या नेवे यांनी सांगितले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाच्या शिक्षिका वैशाली जोशी यांनी केले. कार्यक्रमास महात्मा गांधी विद्यालयाचे उपमुख्याधापक राजेश रोहिदास आणि पर्यवेक्षक तुषार सोनजे तसेच इतर शिक्षकवर्ग उपस्थित होते. कार्यक्रमात मराठी भाषेचा गौरव करणारे एक नवीन गीत विद्यालयाच्या संगीत शिक्षिका स्वरदा गोखले यांनी सादर केले. अंबरनाथ नगरपरिषदेचे नोडल अधिकारी श्री. स्वनिल जाधव आणि इतर अधिकाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यात मोलाचे सहकार्य केले.

# सुरेश बांगर यांच्या मातोश्रींचे वृद्धापकाळाने निधन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड** : मुरबाड तालुक्यातच नव्हे संपूर्ण ठाणे जिल्ह्यात आपल्या लोकसेवेसाठी प्रसिद्ध असलेले, भुवन ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तथा मुरबाड तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व मानव सेवा सामाजिक संस्थेचे अध्यक्ष श्री सुरेश नारायण बांगर यांच्या मातोश्रींचे सोमवार दि. २३ फेब्रुवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. निधनावेळी त्यांचे वय ९२ वर्षाचे होते.



स्वभावाने अत्यंत प्रेमळ असणाऱ्या या मातोश्री वारकरी सुद्धा असल्याने पंढरीच्या पांडुरंगाच्या परमभक्त होत्या. साधी राहणी व उच्च विचारसरणी आयुष्य भर जोपासून काबाडकष्ट करून आपल्या तीनही मुलांना शिक्षण देऊन सुसंस्कारीत केले. सर्वात मोठे रामचंद्र बांगर, द्वितीय एकनाथ बांगर व तृतीय सुरेश बांगर होत. त्याच बरोबर त्यांच्या कुटुंबात सुना,नातू, नाती, नात सुना, पुतणे असा असा खूप मोठा परिवार आहे.

सुरेश बांगर हे सध्या माऊलींच्या प्रेरणेने व आशीर्वादाने शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक व राजकीय जीवनात खूप मोठे कार्य करत असून त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. त्यांच्या जाण्याने बांगर परिवारावर दु:खाची छाया पसरली असून येत्या ७ मार्च रोजी राहत्या घरी भुवनपाडा येथे त्यांचे शेवटचे उत्तरकार्य होणार आहे.


Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024